# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,

३०२,वेक फिल्ड हाऊस,३रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई४००००१.

दूरध्वनीक्र.०२२-२२६९४९८४/८५, Email:dcfmangrovecell@gmail.com/konkanmangroves@gmail.com


**विषय :- मौजे ओशिवरा, ता. अंधेरी जि. मुंबई उपनगर येथील भू.क्र. ६२० या जागेवर कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी केल्याबाबत. श्री. अमजद खान. (तक्रार क्र. 167)**

जा.क्र./ल. ले/समिती/ 254 /सन २०२२-२३

फोर्ट, मुंबई - ४००००१ दिनांक:- 13|01|2023

**प्रति,**

**मा. उपायुक्त (महसूल) तथा पदसिध्द विशेष कार्य अधिकारी,**
**मुख्यमंत्री सचिवालय कक्ष (CMO) कोकण विभाग,**
**कोकण भवन, नवी मुंबई.**

**संदर्भ:-** 1. मुख्यमंत्री सचिवालय कक्ष (CMO) कोकण विभाग, कोकण भवन यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.मशा/सिएमओ/कक्ष -1/कोकण विभाग/रजि.क्र. 303/22 (कावि-981)/जा.क्र.723/2022 दिनांक 22.11.2022

2. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालयाचे पत्र क्र:सी/कार्या-2 आय/कांदळवन/कावि-670/2021 दिनांक 12.07.2022 (प्रत संलग्न)

3. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांचे कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-9/जमिन/1484/सन 2022-23 दिनांक 16.09.2022. (प्रत संलग्न)

उपरोक्त संदर्भ क्र.1 अन्वये विषयांकीत प्रकरणी उक्त कार्यालयाचे स्मरणपत्र कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीस प्राप्त झाले आहे. सदर पत्राचे अवलोकन केले असता तक्रारदार श्री. अमजद खान, सामाजिक कार्यकर्ता यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेली कार्यवाहीची प्रत मुख्यमंत्री सचिवालय कक्ष (CMO) कोकण विभाग यांस कळविण्याबाबत विचारणा केली आहे.

सदर तक्रारी संदर्भात, संदर्भ क्र. 2 व 3 अन्वये, अनुक्रमे जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी यांसकडून प्राप्त झालेल्या अहवालाची छायांकित प्रत पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात येत आहे. कृपया त्याचे अवलोकन करावे. ही विनंती.

**सदस्य सचिव,**
**राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई**

सोबत : वरिलप्रमाणे.

प्रतिलिपी:- १. मा.अध्यक्ष, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना माहितीसाठी सविनय सादर.

२. श्री. अमजद खान, सामाजिक कार्यकर्ता, रा.किशन दुधवाला चाळ, गावदेवी डोंगर, कॅम्पा रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई 400 058 यांना माहितीस्तव.

206

अहवाल प्राप्त

तक्रार क्र. १६७

मुंबई उपनगर

महाराष्ट्र शासन

# मुख्यमंत्री सचिवालय कक्ष (CMO) कोकण विभाग

**कोकण भवन, १ ला मजला, नवी मुंबई- ४०० ६१४**
कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई- ४००६१४
**दूरध्वनी क्रमांक- २७५७२३३३** ईमेल-cmokonkandiv@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र. मशा/सिएमओ/कक्ष-१/कोकण विभाग/रजि.क्र. ३०३/२२(कावि-९८१) /जा.क्र. ७२३/२०२२ दिनांक २२/११/२०२२

**<u>मुख्यमंत्री सचिवालय कक्ष संदर्भ.</u>** **स्मरणपत्र - १**

**प्रति,**
**मा. उपवनसंरक्षक,**
कांदळवन कक्ष मुंबई बलार्ड ईस्टेट,
ब्रिटानिया ॲन्ड कंपनी रेस्टॉरंट फोर्ट,
मुंबई ४००००१.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्र. : 4236 दिनांक : 6/01/23
मुख्य लेखापाल (Suman) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

विषय - मौजे ओशिवरा, ता.अंधेरी, जि.मुंबई उपनगर येथील सी.टी.एस. नं. न.भु.क्र. ६२० या जागेवर कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी करुन त्यावर रुणवाल डेव्हलपर्स प्र.लिमिटेड या विकासकामार्फत लोखंडवाला मधील रुणवाल एलिगेंट या इमारतीचे बांधकाम करुन कांदळवनाचा ऱ्हास व सीआरझेड चे उल्लंघन केले असलेबाबत......

संदर्भ - १) या कार्यालयाकडील पत्र क्र. मशा/सिएमओ/कक्ष-१/कोकण विभाग/रजि.क्र.३०३/ जा.क्र.५१२/२०२२, दि. ०८/०९/२०२२
२) श्री. अमजद खान, सामाजिक कार्यकर्ता, रा.अंधेरी पश्चिम, मुंबई यांचा या कार्यालयास प्राप्त दिनांक १७.११.२०२२ रोजीचा अर्ज.

महोदय

श्री. अमजद खान, सामाजिक कार्यकर्ता, रा. अंधेरी पश्चिम, मुंबई यांनी दिनांक ०७/०९/२०२२ रोजी वरिल विषयाबाबतचा अर्ज या कार्यालयात सादर केलेला होता. सदरचा अर्ज पुढील योग्य ती कार्यवाही करणेसाठी संदर्भिय पत्रान्वये आपले कार्यालयाकडे पाठविणेत आलेला आहे.

सदरच्या प्रकरणावर अद्याप पर्यंत कार्यवाही झालेली नसल्यामुळे, अर्जदार यांनी वरील विषयाचे अनुषंगाने पुन:श्च तक्रार अर्ज दिनांक १७/११/२०२२ रोजी मुख्यमंत्री सचिवालय (CMO) कक्षात दाखल केलेला आहे.

तरी आपल्या स्तरावरून अर्जातील अनुषांगिक मुददयावर योग्य ती चौकशी करुन व शासनाच्या प्रचलित कायदे/नियम/धोरणा नुसार उचित तात्काळ कार्यवाही करावी व अर्जदार यांस परस्पर कळविणेत यावे. तसेच त्याची एक प्रत विभागीय आयुक्त, कार्यालयातील मुख्यमंत्री सचिवालय कक्ष (CMO) कोकण भवन,या कार्यालयाकडे विनाविलंब पाठविणेत यावीत, ही विनंती.

**<u>सोबत :-</u>** दिनांक १७/११/२०२२ रोजीचे फेर तक्रारी अर्जाची छायांकित प्रत आहे.

(मकरंद प्र. देशमुख)
**उपायुक्त (महसूल) तथा**
**पदसिध्द विशेष कार्य अधीकारी**
**मुख्यमंत्री सचिवालय कक्ष**
**कोकण विभाग**

(३)

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
SPEED दूरध्वनी : २६५५६७९९ फॅक्स : २६५५६८०५ ई.मेल :collectormsd@gmail.com

तक्रार क्र. 167

क्र.: सी/कार्या-२ आय/कांदळवन/कावि-६७०/२०२१
दिनांक : १२/०७/२०२२ 10403

प्रति,
संचालक,
महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी
१५ वा मजला, पर्यावरण विभाग,
मंत्रालय, मुंबई -३२

**विषय :** मौजे ओशिवरा ता.अंधेरी येथील न.भू.क्र.६२० या जागेवर कांदळवनाची बेसूमार कत्तल व भरणी करुन त्यावर रुणवाल डेव्हलपर्स प्रा.लि. यांचेमार्फत लोखंडवालामधील रुणवाल एलिगेंट या इमारतीचे बांधकाम करुन कांदळवनाचा ऱ्हास व सीआर झेड चे उल्लंघन केले असलेबाबत...

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 284
दिनांक 05/08/2022
मुख्य लेखापाल उप वनसंरक्षक
Director 08/08/2022

**संदर्भ :** १. श्री. अजमद खान यांचा अर्ज दि.१६/१२/२०२१ व ३०/१२/२०२१.
२. मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचेकडील दि.२९/१२/२०२१ रोजीचे पत्रासोबत श्री.अजमद खान यांचा अर्ज दि.१६/१२/२१.
३. उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल क्र. उविअ/मुंपउ/कार्या-५/कावि- /२०२२ दि.०९/०६/२०२२.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र.१ व २ अन्वये श्री. अजमद खान यांनी मौजे ओशिवरा ता.अंधेरी येथील न.भू.क्र.६२० या जागेवर कांदळवनाची बेसूमार कत्तल व भरणी करुन त्यावर रुणवाल डेव्हलपर्स प्रा.लि. यांचेमार्फत लोखंडवालामधील रुणवाल एलिगेंट या इमारतीचे बांधकाम करुन कांदळवनाचा ऱ्हास व सीआर झेड चे उल्लंघन केले असलेबाबत तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारींच्या अनुषंगाने या कार्यालयाकडून कळविलेनूसार उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी संदर्भ क्र. ३ अन्वये अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर माहितीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने कांदळवन विभागाचे वनरक्षक व मंडळ अधिकारी मरोळ यांनी तक्रारदार यांचेसमवेत विषयांकित मिळकतीची स्थळपाहणी करण्यात आली आहे. स्थळपाहणीवेळी तक्रारदार यांनी मौजे ओशिवरा ता. अंधेरी येथील न.भू.क्र.६२० येथील मे. रुणवाल प्रोजेक्ट प्रा.लि. यांची इमारत दाखविली. सदर इमारत पार्किंगसह २७ माळ्यांची असल्याचे तेथील सिक्युरिटी गार्ड यांनी सांगितले. सदर इमारतीच्या उत्तरेला रोड, दक्षिणेला स्वामी समर्थ नगर व पूर्वेला रहेजा क्रेस्ट तसेच पश्चिमेला मोगरा नाला आहे. स्थळपाहणीवेळी जागेवर कांदळवन असल्याचे दिसून आले नाही. सदर इमारत कांदळवनाची कत्तल करुन व भरणी करुन उभी केल्याचे तक्रारदार यांचे म्हणणे आहे.

प्रकरणी सदर विषयांकित मिळकतीबाबत तक्रारदार श्री. संतोष दौंडकर यांच्या दि. १३/०७/२०१७ रोजीच्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने या कार्यालयाकडील दि. ०७/०६/२०१९ रोजी आदेश पारित करुन तक्रारदार श्री. संतोष दौंडकर यांची तक्रार निकाली काढण्यात आलेली आहे. सबब, पुन्हा श्री. अजमद खान यांनी दाखल केलेली तक्रार ही या कार्यालयाकडील दि. ०७/०६/२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशातील नमूद मुद्यांवरच त्याच मिळकतीशी संबधित असल्याने सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे. (प्रत सामील)

(डॉ. विकास नाईक)
**सदस्य सचिव,**
**जिल्हा सागरतटीय सनियंत्रण समिती**
**तथा निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर**

**स्थळ प्रतिवर मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांची सही असे.**

**प्रत** :१. मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई माहितीसाठी.
२. सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई ३०२, वेक फिल्ड हाऊस, ३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंटजवळ, बॅलार्ड इस्टेट,फोर्ट, मुंबई माहितीसाठी

CMO/22 19571 ०१/२८१ 14
अ.चि.२आय.

महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी क्र. ०२२-२६५१०१३६
ईमेल- sdomsdest@gmail.com

क्रमांक : उविअ/मुंपउ/कार्या-५/काvि- /२०२२
दिनांक : ०९/०६/२०२२

प्रति,
मा.जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
दिनांक : 0 9 JUN 2022

**विषय :** मौजे ओशिवरा तालुका अंधेरी येथील न.भू.क्र.६२० या जागेवर कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी करून त्यावर रूणवाल डेव्हलपर्स प्रा.लि. या विकासकामार्फत लोखंडवाला मधील रूणवाल एलिगेंट या इमारतीचे बांधकाम करून कांदळवनाचा ऱ्हास व सीआरझेडचे उल्लंघन केलेबाबत.

**संदर्भ :** आपले सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन समिती, तथा सहा. वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांना उद्देशून निर्गमित केलेले पत्र क्र. सी/कार्या-२आय/कांदळवन/कावि-६७०/२०२१, दि. २७/१२/२०२१

महोदया,

विषयांकीत प्रकरणी आपले सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन समिती, तथा सहा. वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांना उद्देशून निर्गमित केलेले पत्र क्र. सी/कार्या-२आय/कांदळवन/कावि-६७०/२०२१, दि. २७/१२/२०२१ अन्वये अर्जदार श्री.अमजद खान यांच्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने अहवाल सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले होते. त्याअनुषंगाने तहसीलदार अंधेरी यांनी विषयांकित मिळकतीची स्थळपाहणी करून दि.३०/०३/२०२२ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

कांदळवन विभागाचे वनरक्षक व मंडळ अधिकारी मरोळ यांनी तक्रारदार यांचेसमवेत विषयांकित मिळकतीची स्थळपाहणी करण्यात आली. स्थळपाहणीच्या वेळी तक्रारदार यांनी मौजे ओशिवरा न.भू.क्र.६२० येथील मे.रूणवाल प्रोजेक्ट प्रा.लि. ची इमारत दाखवली. सदर इमारत पार्किंगसह २७ माळयाची असल्याचे तेथील सिक्युरीटी गार्ड यांनी सांगितले. सदर इमारतीच्या उत्तरेला रोड, दक्षिणेला स्वामी समर्थ नगर व पूर्वेला रहेजा क्रेस्ट तसेच पश्चिमेला मोगरा नाला आहे. स्थळपाहणीवेळी जागेवर



Scanned by CamScanner

कांदळवन दिसून आले नाही. सदर इमारत कांदळवनाची कत्तल व भरणी करून उभी केली असल्याचे तक्रारदार यांचे म्हणणे आहे.

तसेच विषयांकित मिळकतीबाबत तक्रारदार श्री.संतोष दौडकर यांच्या दि.१३/०७/२०१७ च्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने आपले कार्यालयामार्फत दि.०७/०६/२०१९ रोजी आदेश पारित करून श्री.संतोष दौडकर यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे. सबब तद्नंतर पुन्हा श्री.अमजद खान यांनी दाखल केलेली तक्रार आपले कार्यालयाकडील दि.०७/०६/२०१९ च्या आदेशामध्ये नमूद मुद्दयांवरच त्याच मिळकतीशी संबंधित असल्याने सदर तक्रार निकाली काढणेस विनंती आहे.

(उमेश बिरारी)
**उपविभागीय अधिकारी,**
**मुंबई पश्चिम उपनगर**

Scanned by CamScanner

मौजे ओशिवरा ता. अंधेरी येथील न.भू.क्र. 620 हा भूखंड अधिसूचित वनक्षेत्रातून वगळण्यात आलेला आहे.

७. सदर प्रकरणी वृक्ष प्राधिकरण यांनी विषयांकित मिळकतीची रितसर स्थळपाहणी करुन दिनांक 08/09/2010 रोजी विषयांकित मिळकतीवरील झाडे तोडण्याबाबत परवानगी दिली असून सदर मिळकतीवर एकही कांदळवनाचे झाड नाही, असे नमूद केले आहे.

८. सदर प्रकल्पास दिनांक 03/09/2014 रोजी पर्यावरण विषयक ना-हरकत (Enviroment Clearence) प्रमाणपत्र मिळाले आहे.

९. मौजे ओशिवरा ता. अंधेरी येथील न.भू.क्र. ६२० या मिळकतीवरील इमारत प्रकल्प हे कांदळवनापासून ५० मीटरच्या आत असल्याने सदर प्रकरणी कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याबाबत श्री. प्रतापलाल तेली यांनी मा. राष्ट्रीय हरित प्राधिकरण यांचेकडे अर्ज क्र. १९१/२०१६ दाखल केला होता. सदर प्रकरणी विविध प्राधिकरणे / विभाग आणि रुनवाल प्रोजेक्ट प्रा. लि. हे देखील प्रतिवादी होते.

10. सदर प्रकरणी मा. राष्ट्रीय हरित प्राधिकरण यांनी दिनांक ०२/०१/२०१७ रोजी आदेश पारित करुन सदर प्रकरणी पर्यावरणाबाबत कोणताही अर्ज नसल्याचे नमूद केले आहे. तसेच प्रकल्पास आवश्यक असणाऱ्या सर्व परवानगी या कायदेशिररित्या घेण्यात आलेल्या असुन सदर प्रकल्पास दिनांक 03/09/2014 रोजी पर्यावरण विषयक ना-हरकत (Enviroment Clearence) प्रमाणपत्र मिळालेले आहे. तसेच सदर प्रमाणपत्राबाबत अद्यापपर्यंत कोणत्याही प्राधिकरणासमोर हरकत घेण्यात आलेला नाही, असेही नमूद करुन श्री. प्रतापलाल तेली यांनी केलेला अर्ज क्र. १९१/२०१६ निकाली काढलेला आहे.

श्री. संतोष दौंडकर यांनी दिनांक ०२/१२/२०१७ रोजी आपले लेखी म्हणणे सादर केले असुन त्यामध्ये खालील मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

१. मौजे ओशिवरा ता. अंधेरी येथील न.भू.क्र. ६२० या भूखंडावर मे. रुणवाल प्रोजेक्ट प्रा.लि. यांनी केलेले बांधकाम हे कांदळवन क्षेत्रापासून ५० मीटरच्या आत म्हणजेच बफर झोन मध्ये आहे, हे महाराष्ट्र रिमोट सेन्सींग ॲप्लीकेशन सेंटर, नागपूर यांनी मा. उच्च न्यायालय यांचे निर्देशावरुन तयार करण्यात आलेल्या नकाशावरुन दिसते.

२. सदर वाद मिळकतीबाबत सॅटेलाइट इमेज, महाराष्ट्र रिमोट सेन्सींग ॲप्लीकेशन सेंटर, नागपूर यांनी तयार केलेले नकाशे यावरुन विषयांकित मिळकतीवरील बांधकाम हे कांदळवनापासुन ५० मीटरच्या आत म्हणजेच बफर झोन मध्ये आहे.

३. तसेच सदर मिळकतीवरील बांधकाम हे बफर झोनमध्ये असल्याने त्याठिकाणी बांधकाम करण्यासाठी मे. रुणवाल प्रोजेक्ट प्रा.लि. यांनी मा. उच्च न्यायालयाची पुर्वपरवानगी घेतलेली नाही.

४. मा. राष्ट्रीय हरित प्राधिकरण यांचे समोर श्री. प्रतापलाल तेली यांनी दाखल केलेल्या अर्ज क्र. १९१/२०१६ मध्ये अर्जदार श्री. दौंडकर हे प्रतिवादी नव्हते. तसेच मा. राष्ट्रीय हरित प्राधिकरण यांनी दिनांक

Scanned by CamScanner

मा. उच्च न्यायालयाकडील दि.१४/०९/२०१७ च्या आदेशाचे / निकालाचे अनुषंगाने मे. रुणावल प्रॉजेक्ट प्रा.लि. यांनी दि.२६/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधीत कागदपत्रासह आपले लेखी म्हणणे सादर केलेले आहे.

- मे. रुणावल प्रॉजेक्ट प्रा.लि. यांनी खालील प्रमुख मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

  १. सदर प्रकरणी मौजे ओशिवरा ता. अंधेरी येथील न.भू.क्र. ६२० या मिळकतीवर असलेले इमारत प्रकल्प हे पूर्ण होत आले असून सदर प्रकल्पातील ३ पैकी २ इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले आहे. सदर इमारत प्रकल्पाचे बांधकाम हे कांदळवनापासून ५० मी. च्या आत करुन कांदळवनाचा/ बफर झोनचा ऱ्हास होत असल्याबाबत सदर प्रकल्पामध्ये केवळ अडथळे निर्माण करण्याच्या हेतूने श्री. दौंडकर यांनी तक्रार दाखल केलेली आहे, असे रुनावल प्रोजेक्ट प्रा.लि. यांनी नमूद केले आहे.

  २. सदर प्रकल्पासाठी रुणवाल प्रोजेक्ट प्रा.लि. यांनी सर्व आवश्यक त्या परवानगी प्राप्त करुन घेतलेल्या असून कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगर पालिका यांचेकडून रितसर इमारतीचे आराखडे मंजूर करुन घेतले आहेत. तसेच सदर प्रकल्प हा महाराष्ट्र रिअल इस्टेट रुग्युलेटरी ॲथोरिटी यांचेव नोंदणीकृत असून त्याचा नोंदणी प्रमाणपत्र क्र. P 51800003620 असा आहे.

  ३. सन 2009 च्या आसपास रुनवाल प्रोजेक्ट प्रा. लि. यांनी मौजे ओशिवरा ता. अंधेरी येथील न.भू.क्र. 620 ही खरेदीखताने विकत घेतलेली आहे.

  ४. मौजे ओशिवरा ता. अंधेरी येथील न.भू.क्र. ६२० या मिळकतीवर काही ठिकाणी कांदळवन दिसुन आल्याने सदर क्षेत्र वनक्षेत्र म्हणून घोषित करण्याकामी दिनांक 18/02/2009 रोजी अधिसूचना प्रसिध्द करुन त्याबाबत हरकती मागविण्यात आल्या होत्या. सदर अधिसूचनेविरुध्द रुणवाल प्रोजेक्ट प्रा. लि. यांनी आपला लेखी आक्षेप नोंदविला होता.

  ५. सदर आक्षेपाच्या अनुषंगाने विषयांकित मिळकतीची स्थळपाहणी करण्याकामी तसेच सदर भूखंड हा वनक्षेत्र आहे की नाही, याबाबत चौकशी करण्याकामी शासनाकडील दिनांक 11/02/2009 रोजीच्या पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर आणि मा. मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांची एक संयुक्त समिती गठित कर त आली. सदर समितीने दिनांक 25/11/2009 रोजी स्थळपाहणी करुन सादर केलेल्या अहवालामध्ये सदर जागेवर जनतरण तलाव, टेनिस कोर्ट आणि शेडस् असून त्यांचे बांधकाम पुर्ण झालेले आहे. सदर ठिकाणी फक्त बाबुळ प्रजातीची व अन्य जंगली झाडे आढळून आली असून सदर क्षेत्रावर कांदळवन नसल्याचे नमूद केलेले आहे.

  ६. उपरोक्त आक्षेपाच्या अनुषंगाने गठित केलेल्या कांदळवनाचे क्षेत्र असलेली खाजगी जमीन वने म्हणू अधिसुचित करण्याबाबत आक्षेप निवारण समितीने सादर केलेल्या अहवालानुसार शासन, महसूल व व विभाग यांनी दिनांक 05/05/2010 रोजीच्या पत्रान्वये मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांना मौ ओशिवरा ता. अंधेरी येथील न.भू.क्र. 620 हा अधिसूचनेतून वगळण्याबाबत कळविले होते. त्या अनुषंगा मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांनी दिनांक 19/05/2010 रोजी अधिसूचना प्रसिध्द करुन सद

Scanned by CamScanner

मौजे ओशिवरा ता. अंधेरी येथील न.भू.क्र. 620 हा भूखंड अधिसूचित वनक्षेत्रातून वगळण्यात आलेला आहे.

७. सदर प्रकरणी वृक्ष प्राधिकरण यांनी विषयांकित मिळकतीची रितसर स्थळपाहणी करुन दिनांक 08/09/2010 रोजी विषयांकित मिळकतीवरील झाडे तोडण्याबाबत परवानगी दिली असून सदर मिळकतीवर एकही कांदळवनाचे झाड नाही, असे नमूद केले आहे.

८. सदर प्रकल्पास दिनांक 03/09/2014 रोजी पर्यावरण विषयक ना-हरकत (Enviroment Clearence) प्रमाणपत्र मिळाले आहे.

९. मौजे ओशिवरा ता. अंधेरी येथील न.भू.क्र. ६२० या मिळकतीवरील इमारत प्रकल्प हे कांदळवनापासून ५० मीटरच्या आत असल्याने सदर प्रकरणी कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याबाबत श्री. प्रतापलाल तेली यांनी मा. राष्ट्रीय हरित प्राधिकरण यांचेकडे अर्ज क्र. १९१/२०१६ दाखल केला होता. सदर प्रकरणी विविध प्राधिकरणे / विभाग आणि रुनवाल प्रोजेक्ट प्रा. लि. हे देखील प्रतिवादी होते.

10. सदर प्रकरणी मा. राष्ट्रीय हरित प्राधिकरण यांनी दिनांक ०२/०१/२०१७ रोजी आदेश पारित करुन सदर प्रकरणी पर्यावरणाबाबत कोणताही अर्ज नसल्याचे नमूद केले आहे. तसेच प्रकल्पास आवश्यक असणाऱ्या सर्व परवानगी या कायदेशिररित्या घेण्यात आलेल्या असुन सदर प्रकल्पास दिनांक 03/09/2014 रोजी पर्यावरण विषयक ना-हरकत (Enviroment Clearence) प्रमाणपत्र मिळालेले आहे. तसेच सदर प्रमाणपत्राबाबत अद्यापपर्यंत कोणत्याही प्राधिकरणासमोर हरकत घेण्यात आलेला नाही, असेही नमूद करुन श्री. प्रतापलाल तेली यांनी केलेला अर्ज क्र. १९१/२०१६ निकाली काढलेला आहे.

श्री. संतोष दौंडकर यांनी दिनांक ०२/१२/२०१७ रोजी आपले लेखी म्हणणे सादर केले असुन त्यामध्ये खालील मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

१. मौजे ओशिवरा ता. अंधेरी येथील न.भू.क्र. ६२० या भूखंडावर मे. रुणवाल प्रोजेक्ट प्रा.लि. यांनी केलेले बांधकाम हे कांदळवन क्षेत्रापासून ५० मीटरच्या आत म्हणजेच बफर झोन मध्ये आहे, हे महाराष्ट्र रिमोट सेन्सींग ॲप्लीकेशन सेंटर, नागपूर यांनी मा. उच्च न्यायालय यांचे निर्देशावरुन तयार करण्यात आलेल्या नकाशावरुन दिसते.

२. सदर वाद मिळकतीबाबत सॅटेलाइट इमेज, महाराष्ट्र रिमोट सेन्सींग ॲप्लीकेशन सेंटर, नागपूर यांनी तयार केलेले नकाशे यावरुन विषयांकित मिळकतीवरील बांधकाम हे कांदळवनापासुन ५० मीटरच्या आत म्हणजेच बफर झोन मध्ये आहे.

३. तसेच सदर मिळकतीवरील बांधकाम हे बफर झोनमध्ये असल्याने त्याठिकाणी बांधकाम करण्यासाठी मे. रुणवाल प्रोजेक्ट प्रा.लि. यांनी मा. उच्च न्यायालयाची पुर्वपरवानगी घेतलेली नाही.

४. मा. राष्ट्रीय हरित प्राधिकरण यांचे समोर श्री. प्रतापलाल तेली यांनी दाखल केलेल्या अर्ज क्र. १९१/२०१६ मध्ये अर्जदार श्री. दौंडकर हे प्रतिवादी नव्हते. तसेच मा. राष्ट्रीय हरित प्राधिकरण यांनी दिनांक

Scanned by CamScanner

०२/०१/२०१७ रोजी आदेश पारित करताना वाद मिळकतीवर बफर झोनमध्ये बांधकाम करण्याकामी परवनगी दिलेली नाही.

५. सदर प्रकरणी विकासक यांनी कायदा आपल्या हातात घेऊन आपल्या फायद्यासाठी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करुन पर्यावरणाचा ऱ्हास केलेला आहे.

निष्कर्ष :

उपरोक्त प्रकरणातील वस्तुस्थितीचे अवलोकन केले असता, मा. राष्ट्रीय हरीत प्राधिकरण (National Green Tribunal) यांचेकडे दाखल केलेला अर्ज क्र. १९१/२०१६ मध्ये अर्जदार श्री. प्रतापलाल तेली यांनी नमूद केलेले मुद्दे आणि सदर प्रकरणी तक्रारदार श्री. संतोष दौंडकर यांनी या कार्यालयात दाखल केलेल्या तक्रारीतील नमूद केलेले मुद्दे एकाच मिळकतीबाबत आहेत.

मा. राष्ट्रीय हरीत प्राधिकरण (National Green Tribunal) यांनी दिनांक ०२/०१/२०१७ रोजी आदेश पारित करुन त्यांचेकडे दाखल अर्ज क्र. १९१/२०१६ निकाली काढलेला आहे. सदर प्रकरणी मा. राष्ट्रीय हरीत प्राधिकरणाने विषयांकित मिळकतीबाबत आदेश पारित केलेला असल्याने सदर आदेशास अनुसरुन मी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अन्वये खालीलप्रमाणे आदेश देत आहे :

आदेश :

१) मा. राष्ट्रीय हरीत प्राधिकरण (National Green Tribunal) यांनी दिनांक ०२/०१/२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार तक्रारदार श्री. संतोष दौंडकर यांची दि. १३/०७/२०१७ रोजीची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) सदरचा आदेश खर्चाबाबत नाही.

३) सर्व संबंधीतांना कळवावा.

(सचिन कुर्वे)
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर

ठिकाण :- वांद्रे (मुंबई)
दिनांक : ०७/०६/२०१९

प्रत : १) मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांपा माहितीस्तव सविनय सादर.

२) मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना माहितीसाठी सविनय सादर.

३) श्री. संतोष दौंडकर,रा. 10/37, बी.आय.टी. चाळ, के.के. मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई- 08

४) रूणवाल प्रोजेक्ट प्रा.लि., रूणवाल अँन्ड ओमकार इसक्वेयर, 5 वा मजला, सायन चुनाभट्टी सिग्नल समोर, सायन (पूर्व) मुंबई -400 022

TRUE COPY 4 Pages
Copy applied on 15/06/2019
Copy ready on 15/06/2019
Rs. 200/-
Copied by
Compared by Vishal Nangare (Clerk)
04/-
Total Rs. 204/-
Asst. Chitnis
Mumbai Suburban District

D:\1.1.2018\Kandalvan Complaints\doundkar & runwal .docx

Scanned by CamScanner

तक्रार क्र. 167


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव   महाराष्ट्र वन विभाग

दूरध्वनीक्र.022-25220097

EmailId:dfommcu@gmail.com

महाराष्ट्र शासन

वनविभाग

**विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक**

**यांचे कार्यालय**

ब-६८, कामगार नगर, टिळकनगर स्टेशन जवळ, कुर्ला (पूर्व), मुंबई ४०००२४


---

जा.क्र. कक्ष-९/जमिन/ 1484 / सन २०२२-२३ दिनांक. 16 /०९/२०२२

प्रति,

सदस्य सचिव,
राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा मा. उप वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई.

विषय - मौजे ओशिवरा, ता. अंधेरी जि. मुंबई उपनगर येथील भू.क्र. ६२० या जागेवर कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी केल्याबाबत श्री. अमजद खान (तक्रार क्र. १६७)

संदर्भ - १. आपलेकडील पत्र क्र. ल.ले/समिती/०४/२०२२-२३ दि. ०७/०४/२०२२.
२. मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालयातील पत्र क्र.सी/कार्या-२आय/कांदळवन/ कावि-६७०/१३३३/२०२१ दिनांक २४/०१/२०२२.
३. वनक्षेत्रपाल पश्चिम मुंबई यांचेकडील पत्र क्र. अंधेरी तक्रार/१६२५/२०२१-२२ दि. २२/०३/२०२२.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये आपलेमार्फत श्री. अमजद खान (सामाजिक कार्यकर्ता) यांचे तक्रारी अर्ज या कार्यालयात प्राप्त झाले. तसेच संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये सदर तक्रारी अर्ज या कार्यालयात कांदळवन समिती अंतर्गत देखील प्राप्त झाले होते. त्याअनुषंगाने वनक्षेत्रपाल पश्चिम मुंबई यांनी संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये अहवाल तयार करुन अध्यक्ष कांदळवन संरक्षण व संवर्धन समिती तथा उपविभागीय अधिकारी मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडे सादर करुन त्याची प्रत श्री. अमजद खान (सामाजिक कार्यकर्ता) यांना माहितीसाठी सादर केलेली आहे.

तरी सदरचे क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नसल्याने महसूल विभागाकडून कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई**
आवक क्र. : 2124 दिनांक : 26/9/22.
मुख्य लेखापाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

Mangrove committee

(एम. आदर्श रेड्डी)
विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक

प्रतिलिपी - सहाय्यक वनसंरक्षक, कांदळवन संरक्षण, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

26/9

A 56


# वनपरीक्षेत्र अधिकारी, मुंबई कांद्ळवन संधारण घटक पश्चिम मुंबई, यांचे कार्यालय,

स. न. १४७ पंचम सोसायटी जवळ, गोखले महाविद्यालय मार्ग, गोराई, बोरीवली (प.) ४०० ०९१

Email:- rfomangrovewm@gmail.com


विषय : मौजे ओशिवरा ता.अंधेरी जि.मुंबई(उपनगर) येथील सी.टी.एस. 620 या जागेवर कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी करून त्यावर रूणवाल डेव्लपर्स प्रा.लि.या विकासकामार्फत लोखंडवाला माधील रूणवाल एलिगेंट या इमारतीचे बांधकाम करून कांदळवनाचा ऱ्हास व सीआरझेड चे उल्लंघन केले असलेबाबत.

जा.क्र. पश्चिम मुंबई/ अंधेरी तक्रा./1625/2021-22

बोरीवली दि : 22/3/2022

प्रति,

मा. अध्यक्ष,

कांदळवन संरक्षण व संवर्धन समिती,

तथा मा. उपविभागीय अधिकारी

मुंबई पश्चिम उपनगर.

**संदर्भ :** १) मा. सदस्य सचिव कांदळवन संरक्षण व संवर्धन संनियत्रण समिती तथा सहा. वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कडील जा.क्र.सवसं/कांसंमुं/513/2021-22, दि.25.02.2022

२) श्री. अमजद खान (समाजिक कार्यकर्ता)यांचा दि.१६/१२/२०२१ चा तक्रार अर्ज.

४) श्री. अमजद खान (समाजिक कार्यकर्ता)यांचा दि.३०/१२/२०२१ चा तक्रार अर्ज.

३) वनपाल अंधेरी यांचे कडील पत्र जा.क्र.अंधेरी तक्रा./१२४०/२०२१-२२ दि. ०७/०१/२०२२

सहाय्यक वनसंरक्षक
कांदळवन संरक्षण, मुंबई
यांचे कार्यालय
आवक क्रमांक :- 3930
दिनांक :- 29/3/22
Hemant
वन कर्मचारी    सहाय्यक वनसंरक्षक

**मुळ तक्रारदार नाव :** श्री. अमजद खान, सामाजिक कार्यकर्ता

**पत्ता :** किशन दुधवाला चाळ,गावदेवी डोंगर,कॅम्पा रोड,अंधेरी(प),मुंबई-

**फोन नं:** 9820717153

महोदय,

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकित प्रकरणी श्री. अमजद खान यांचा मौजे ओशिवरा न.भु.क्र. 620 मधील तक्रार अर्जाबाबतचा मुद्देनिहाय अहवाल सादर करीत आहे तो खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| **१)स्थळाचे वर्णन :** | ओशिवरा न.भु.क्र. 620 |
| **२)तक्रारीचा तपशील :** | कांदळवनाचा ऱ्हास करून बांधकाम आणि सी.आर.झेड. चे उल्लंघ केल्याबाबत. |
| **३)स्थळाचे जी.पी.एस.रिडिंग -** | 1) N 19 08 26.98 E 72 49 40.90<br>2) N 19 08 28.20 E 72 49 41.60 |
| **४)Geo Tag Photo -** | सोबत जोडले आहेत. |
| **५)स्थळपंचनामा -** | सोबत जोडला आहे. |

| | |
|---|---|
| ६)तक्रार क्षेत्राचा वैधानिक दर्जा- | |
| अ)तक्रारीत नमुद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र आहे का? असल्यास अधिसुचना क्र. तक्रारीत नमूद क्षेत्र अधिसुचित क्र. | नाही |
| ब)सदरचे क्षेत्र बफर झोन मध्ये येते का? असल्यास अंतर (मी.) | --------- |
| क)सदरचे क्षेत्र खासगी कांदळवन क्षेत्र आहे का ? | होय |
| ड)सदरचे क्षेत्र सरकारी क्षेत्र आहे का? | -------- |
| ७)सन ३१ डिसेंबर २००५ रोजी MRSAC Map नुसार नमुद जागेवर कांदळवन होते का ? | होय |
| ८)सद्यस्थितीत नमुद जागेवर कांदळवन आहे किंवा कसे याबाबत सुस्पष्ट अभिप्राय : | नाही, सध्यस्थितीत रूणवाल एलिगेंट ची इमारती आहेत. |
| ९)अधिसुचित कांदळवन क्षेत्र असल्यास प्रथम गुन्हा नोंद केला आहे का? | --------- |
| १०)अधिसुचित कांदळवन क्षेत्रा व्यतिरिक्त क्षेत्र असल्यास संबंधित यंत्रणेस लेखी कळविण्यात आले आहे का? | -------- |
| ११)कोणत्या विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे? | -------- |
| १२)वनक्षेत्रपाल यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीचा स्वयंस्पष्ट अभिप्राय - | MRSAC नुसार सन 2005 रोजी या जागेवर कांदळ दिसून येत आहे. सदरचे क्षेत्र अधिसुचित राखीव कांदळवन भाग नाही. सदरचे क्षेत्र वनविभागाच्या ताब्यातील क्षेत्र नाह |
| १३)वनक्षेत्रपाल यांचा सदरची तक्रार निकाली काढावी किंवा कसे याबाबतचा स्वयंस्पष्ट - | सदरचे क्षेत्रावर सध्या रूणवाल एलिगेंट च्या इमारती दि येत आहेत. सन 2012 च्या सुरवातीपासून सदरच्या इमार काम चालू झाल्याचे दिसून येत आहे. ही जागा विभागाच्या ताब्यतील क्षेत्रापैकी नाही. |

(एस.एम. देशपांडे)
वनपरीक्षेत्र अधिकारी,
मुं.का.सं.घ.पश्चिम मुंबई

प्रतिलीपी :- १) मा. सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा सहाय्यक वनसंरक्षक, कांदळवन संरक्षण, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) तहसिलदार अंधेरी यांना माहितीसाठी सादर.

३) श्री. अमजद खान (समाजिक कार्यकर्ता) यांना माहितीसाठी.